


# पाटोदा संचार

संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे | संपादक-विलास डोळसे | E-mail-pat.sanchar@gmail.com

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक २२५ वा ❑ मंगळवार दि. २१ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -225 ❑ Tuesday 21 October 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

## राज्यात अतिवृष्टी, पूरबाधितांना मदतीचा ओघ सुरुच;
## राज्य सरकारकडून ६४८ कोटी रुपयांचा आणखी निधी मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात मागील काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे अनेक जिल्ह्यांतील शेती, घरे, पायाभूत सुविधा आणि रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर बाधितांना मदतीचा ओघ सुरुच असून राज्य सरकारकडून नुकताच ६४८ कोटी रुपयांचा आणखी निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्य सरकारने या निधीच्या वितरणाला मान्यता दिली असून, विविध महसूल विभागांनुसार संबंधित जिल्ह्यांना निधी वितरित केला जाणार आहे. हा निधी विशेषत: शेतीतील नुकसान भरपाई, घरांची पुनर्बांधणी, रस्ते आणि पूल दुरुस्ती तसेच प्राथमिक सुविधा पुनर्संचयित करण्यासाठी वापरण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**कोणत्या विभागांना किती निधी?**

**छत्रपती संभाजीनगर विभाग**

बीड, लातूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांना निधी वितरित करण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

**नागपूर विभाग**

नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी आणि पूरामुळे रस्ते वाहतुकीसह शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या भागांना आवश्यक मदत तातडीने पोहोचविण्यासाठी निधी वितरित केला जाईल.

**नाशिक विभाग**

नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यांनाही निधीचा लाभ मिळणार आहे. या भागात पिकांच्या नुकसानीबरोबरच काही ठिकाणी घरांचेही नुकसान झाले आहे.

अमरावती विभाग

अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यांनाही मदतीचा निधी मिळणार आहे. या भागात शेती तसेच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा पुनर्संचयित करण्यासाठी निधीचा वापर केला जाणार आहे.

**पुणे विभाग**

सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांना निधी वाटप करण्यात आले आहे. विशेषत: सांगली जिल्ह्यातील नदीकाठच्या भागात पाण्याने केलेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी ही मदत उपयुक्त ठरणार आहे.

**कोकण विभाग**

ठाणे आणि पालघर जिल्ह्यांनाही मदतीचा निधी देण्यात आला असून, पावसामुळे बाधित झालेल्या किनारपट्टी भागांतील नागरिकांना आवश्यक सहाय्य मिळेल.

राज्य सरकारने स्पष्ट केले आहे की, हा निधी तातडीने वितरित करून बाधित नागरिकांना मदत पोहोचविणे, शेतीतील नुकसानाची भरपाई आणि सामान्य जनजीवन सुरळीत करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. तसेच जिल्हा प्रशासनाला निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## शेतकऱ्यांनो, आत्महत्या करण्यापेक्षा एखाद्या आमदाराला कापून टाका

### बच्चू कडू यांच्या खळबळजनक विधानाची राज्यभर चर्चा

बुलढाणा । प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अत्यंत वादग्रस्त आणि धक्कादायक विधान करून मोठी खळबळ उडवून दिली आहे.शेतकरी आत्महत्येच्या विषयावर बोलताना त्यांनी थेट आमदारांना 'कापून टाकण्याची' भाषा केली आहे. तसेच हा कार्यक्रम सुरू केला, तर सरकार गुडघ्यावर येईल. पण मरण्यापेक्षा लढणे सुरू करा, असेही बच्चू कडू म्हणाले.




सध्या बच्चू कडू हे राज्यभर दौरा करीत आहेत. शेतकरी हक्क परिषदेत बोलताना त्यांनी हे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, शेतकऱ्यांवर सातत्याने अन्याय होत असताना गप्प आहेत. जाती-पातीच्या राजकारणात शेतकरी अडकून पडले आहेत. ते

पान दोन वर




## महायुतीच्या आमदारांना दिवाळी भेट, प्रत्येकी दोन कोटींचा विकासनिधी वाटप

मुंबई । प्रतिनिधी

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या प्रथमच निवडून आलेल्या विधानसभा सदस्यांना दिवाळी भेट दिली आहे. मंत्री शिरसाट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून प्रत्येकी २ कोटींचा निधी मंजूर करून वितरित केला आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत राबवण्यात येणाऱ्या या योजनेद्वारे दलित वस्त्यांमध्ये विविध विकासकामे केली जातात. ही योजना राज्यातील लोकप्रिय योजनांपैकी एक असून, आमदार, खासदार, मंत्री व इतर लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील सामाजिक विकासासाठी निधी देण्यात येतो.

गेल्या काही महिन्यांपासून अनेक लोकप्रतिनिधींकडून निधीची मागणी होत होती. उपलब्ध निधी आणि मागणी यामध्ये समतोल राखत, मंत्री शिरसाट यांनी प्रथमच विधानसभेत निवडून आलेल्या महायुतीच्या आमदारांना २ कोटींचा निधी मंजूर केला आहे. दिवाळीपूर्वी हा निधी वितरित झाल्याने आमदारांमध्ये समाधानाचे

पान दोन वर

## कलेक्टरचा भाच्चा असल्याचे सांगून जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याला घातला ८ लाखांचा गंडा

केज । प्रतिनिधी

माझे मामा जिल्हाधिकारी असून मी त्यांचा भाच्चा आहे. तुमच्या संस्थेला जमीन मिळवून देतो, असे सांगून चक्क एका जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याला ८ लाख २० हजारांचा गंडा घातल्याचा प्रकार उघड झाला आहे. फसवणूक केलेल्या कर्मचाऱ्याने पोलिस निरीक्षक यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

या बाबतची माहिती अशी की, तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे माझे मामा असून मी त्यांचा भाच्चा आहे. असे सांगून बीड जिल्हा परिषदेचे कर्मचारी विनायक कराड यांना बीड जिल्ह्यातील महेश सुधाकर कुलकर्णी (रा. उदय नगर, धारूर) याने संत गजानन महाराज संस्थानला केज येथील सर्व्हे नं. ३२ या सरकारी गायरान जमिनीतील जमीन मिळवून देण्याचे आमिष दाखवून दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी ५० हजार नगदी रोख स्वरूपात घेतले.

त्यानंतर वेगवेगळ्या तारखेला कराड यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने ७ लाख ७० हजार ४०० रु. आणि त्यांच्या पत्नीकडून १ लाख ११ हजार ६०० रुपये असे एकूण ८ लाख २० हजार ४०० रुपये घेऊन फसवणूक केली. विनायक कराड यांनी त्यांना सदर जमीन ही संस्थानला देण्यासंबंधी वारंवार विनंती करूनही त्यांची मागणी पूर्ण केली नाही किंवा त्यांनी दिलेले पैसे देखील परत केले नाहीत. म्हणून विनायक कराड यांनी दि. १५ ऑक्टोबररोजी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची भेट घेऊन त्यांना लेखी अर्जाद्वारे त्यांची फसवणूक केल्या प्रकरणी महेश कुलकर्णी यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**अनेकांची फसवणूक झाली असावी!**

महेश कुलकर्णी यांनी एका कर्मचाऱ्यांची केलेली फसवणूक ही उघड झालेले आहे. मात्र, अशा प्रकारे त्यांच्याकडून अनेकांची फसवणूक झाली असावी, अशी शक्यता नाकारता येत नाही.






पाटोदा संचार

# सोन्याच्या भावाचा उच्चांक

सोने बाजारात सोने दररोज नवे उच्चांक प्रस्थापित करत आहे. आपणच भावाचा उच्चांक स्थापित करायचा आणि आपणच मोडायचा असा सोन्याचा खेळ सुरू आहे. सोन्याचा खेळ होतो परंतु सर्वसामान्यांचा जीव जातो अशी स्थिती आहे. तोळा तर दूरच पण एखादा मासा-गुंजभर घेण्यासही त्याच्यासाठी महाग आहे. एकेकाळी देशात सोन्याचा धूर निघत असे म्हणे आज त्याचा वाराही लागेनासा झाला आहे. सणासुदीचा काळ सुरू होताच सोने खूपच शेफारते. त्याच्यापुढे हिमालयसुद्धा ठेंगणा भासू लागतो. सोने वरचेवर शेफारत चालल्याने ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.

दिवाळीत सोने खरेदी करणे म्हणजे दिवाळं काढून घेण्यासारखेच आहे. सोन्याचे भाव का वाढत चालले आहेत हे न उलगडणारे कोडे आहे. बुधवारी पुन्हा एकदा सोन्याच्या दरवाढीने उचल खाल्ली. स्थानिक बाजारात २४ कॅरेट सोन्याचा दर सव्वा लाख रुपयांच्या पुढे गेला. सण-उत्सवासह लग्नसराईचे वेध लागल्याने खरेदीत वाढ झाली असली तरी ग्राहकांना सोने खरेदीचे नियोजन करताना अतिरिक्त खर्चाचा विचार करावा लागत आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरतेसह देशांतर्गत मागणीमुळे सोन्याच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे. बुधवारी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किमतीने प्रति औंस ४ हजार डॉलर्सचा टप्पा ओलांडला. इतिहासात पहिल्यांदाच सोन्याच्या किमतींनी हा टप्पा ओलांडला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात यू. एस. ट्रेझरी बाँडवरील उत्पन्न दरात घसरण झाल्यामुळेही सोन्याला आधार मिळाला आहे. गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून पैसा काढून सुरक्षित पर्याय म्हणून सोन्यात गुंतवणूक वाढवली आहे. चांदीने सुद्धा १ लाख ५६ हजार ५६० रुपयांचा नवीन उच्चांक केला. मुंबईच्या सराफा बाजारात मंगळवारी १० ग्रॅम सोन्याचा दर १ लाख २५ हजार ५०० रुपयांवर पोहोचला. बुधवारी त्यात दीड हजार रुपयांची वाढ झाली. जीएसटी आणि घडणावळीसह १० ग्रॅम सोन्यासाठी १ लाख ४० हजार ८१० रुपये मोजावे लागले. दिवाळीत हे दर आणखी वाढणार यात शंका नाही.

दररोज सराफ व्यावसायिक सर्वसाधारणपणे सुमारे ९० टन सोने खरेदी करतात. बुधवारी जागतिक पातळीवर सोन्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढल्याने दर वाढत आहेत. दिवाळीत सोने तोळ्याला १० हजार रुपये वाढणार असा अंदाज आहे. महिलावर्ग नाकातली नथनी आणि कानातील फुलासाठीही महाग झाला आहे. महिलावर्गाची धडपड 'थोडं थोडं का होईना पण सोनं घेऊन ठेवायचं' अशी होती. कारण कधीही ते अडचणीच्या काळी उपयोगात येतं. आजचा सोन्याचा दर पाहिल्यास, त्यांची धडपड लाख मोलाची होती हे लक्षात येते. भारतातील सोन्याच्या कर्जाचा बाजार २.९४ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. हा नवीन कल ग्रामीण आणि शहरी कर्जदारांच्या अल्प मुदतीच्या तरलतेची वाढती भूक दाखवणारा आहे. लोकांना त्यांच्या व्यवसायाच्या गरजा, अचानक आपत्कालीन परिस्थिती किंवा वैयक्तिक खर्चासाठी सोने न विकता तारण ठेवून त्वरित पैसे उभे करायचे आहेत. सोन्याचे चढे दर आणि सुलभ अल्प मुदतीच्या पतपुरवठ्याचा भारतीय फायदा घेत आहेत. यंदा सोन्याचे भाव ४७ टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहेत.

भारतात प्रत्येक कुटुंबात सोने हा भावनिक आणि खरेदीचा मुद्दा असतो. रशिया-युक्रेन संघर्षानंतर रशियाच्या परकीय चलन साठ्याचा मोठा भाग घटला. जागतिक संघर्ष, टॅरिफ वाद, मध्यवर्ती बँका सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची करत असलेली खरेदी, चीनचे सोने साठवणूक धोरण यामुळे सोन्याचे दर वाढत आहेत असे म्हटले जाते. केवळ संपत्तीचे प्रतीक म्हणून नव्हे तर धार्मिक-सांस्कृतिक महत्त्व असल्याने भारतात सोन्याविषयीची आस आहे. देशात घरोघरी असलेले सोने लक्षात घेतले तर ते सुमारे २५ हजार टन असेल. सोने जवळ असणे सर्वसामान्य माणसाला सुरक्षित वाटते.

# संतांच्या विचारातील दिवाळी




शशिकांत तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
मो :९१३०८३५४५८

संपूर्ण जगभरात दिवाळीला दिव्यांचा उत्सव म्हणून ओळखल्या जात असले तरी दिवाळी सण साजरा करण्यामागे पौराणिक संदर्भ आहे. भारतीय संस्कृती ही उत्सवप्रिय असून प्रत्येक उत्सव साजरा करण्यामागे प्रांतपरतत्वे भिन्नता आढळून येते.परंतु दिवाळी सण साजरा करीत असताना संपूर्ण देशात सारखेपणा दृष्टीस पडतो. अश्विन कृष्ण पक्षात धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मी-कुबेर पूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज या सलग येणाऱ्या पाच सणांच्या समूहास दिवाळी म्हटल्या जाते.या सणाचे महत्त्व सण-उत्सव साजरा करण्यामागची पार्श्वभूमी भिन्नभिन्न आहे. श्रीमंत, गरीब,शेतकरी, कामगार, मजूर बुद्धजीवी आदी सर्वांना या सणांची उत्कंठा ही असते.दिवाळीचे मांगलिक पर्व मानवास तन-मन-धनाने समृद्ध करीत असते. जीवनात ही समृद्धी अक्षय कायम राहो हे शुभचिंतन सुद्धा करतात. लौकिक जीवनात दिवाळीचे महत्त्व अनन्यसाधारण तर आहेच,शिवाय परमार्थिक अंगाने सुद्धा आपल्या संतांनी दिवाळीच्या पारंपारिक आनंदाला आध्यात्मिक प्रकाशाशी जोडलेले आहे.

संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी सारख्या अमृततुल्य वाङ्मयातून मानवाला 'अविवेकाची काजळी' फेकून देऊन 'विवेकाचा दीप' प्रज्वलित करण्याचा संदेश दिला आहे. लक्ष.. लक्ष..दीप उजळून तिमिरावर मात करणाऱ्या मानवाला ज्ञानोबाचा संदेश अत्यंत मोलाचा आहे. 'आत्मज्योती' जागृत करण्यासाठी संतांची सारी धडपड आहे.अविवेकाची काजळी दूर सारल्या शिवाय लौकिक जीवनाला अर्थ नसतो.एका दिव्याने असंख्य दिवे प्रज्वलित करून प्रकाशज्योतीचा प्रसार होतो.त्याचप्रमाणे ज्ञानदीप प्रज्वलित करण्याची अभिलाषा आणि कार्य संतांनी केले आहे.शाश्वत सुख प्रदान करणाऱ्या भक्तीच्या वाटेवर संत नामदेव चालताना म्हणतात..

नाचू कीर्तनाचे रंगी श्र ज्ञानदीप लावू जगी ।।

आणि हे कार्य करीत असताना नामदेवराय एकटे नाहीत.सोबत द्वारकाधीश पांडुरंग परमात्मा आहे.संत भक्तिमार्गावर मार्गक्रमण करीत हाती ज्ञानदीप घेऊन सर्वांना आग्रह करतात.

जे जे आपणांसी ठावे ।
ते ते इतरांसी सांगावे ।
शहाणे करून सोडावे सकलजन ।।

ज्ञान हे अक्षय आहे.तिला प्रवाही ठेवणे कधीही चांगले,म्हणूनच संतांनी हा बोध केला असावा. अलीकडच्या काळात 'नॉलेज इज करन्सी' म्हणणारे स्वामी विवेकानंद असो की,संतांचे वाङ्मय यात विलक्षण साम्यता दिसते.

जीवनात संगतीच्या लाभावर भाष्य करताना संत तुकोबाराय म्हणतात-

दसरा दिवाळी तोचि आम्हा सण ।
सखे संतजन भेटतील ।।

भक्तीरसात चिंब झालेले सखे संतजन जेव्हा भेटतात;जेव्हा त्यांचा सहवास लाभतो. दिवस संतांच्या जीवनात दसरा दिवाळी सणासारखा असतो. पंढरपुराच्या वाळवंटात पांडुरंगाच्या महाद्वारात सर्व जाती-धर्माचे लोक कुठलाही मनी भेद न बाळगता येतात. विठ्ठल भक्तीच्या एका मर्मबंधात संतमंडळी बंदिस्त असतात.आपण आजही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघतोच. विठ्ठल भक्तीत दंग होऊन ते नाचतात- बागडतात. तिथे हरिकिर्तन, प्रवचन, भजन, हरिपाठ,ज्ञानेश्वरी सारखे ज्ञानकुंड अतीव आनंद देणारे असते. खऱ्या अर्थाने तिथे विठोबाचे राज्य आलेले असते. याची अनुभूती संत नामदेवरायांना घेता आली. म्हणूनच ते बोलून जातात..

विठोबाचे राज्य,आम्हा नित्य दिवाळी

हरिनामात दंग झालेली निर्मोही हरिभक्त मंडळी जेव्हा आपल्या घरी येतात. तेव्हा तुकोबाराय म्हणतात...

साधुसंत येती घरा श्र तोचि दिवाळी दसरा

संतांनी या आत्मिक आनंदाचे अनुभूती घेतली नंतर काव्य स्वरूपात मांडली. संताच्या विचारांचे सकारात्मक वळण आपल्या मनाला लावणे गरजेचे आहे. मनाला बोध करताना समर्थ रामदास स्वामी म्हणतात...

मना सज्जना भक्ती पंथेचि जावे ।

जीवनात खरी दिवाळी अनुभवता यावी म्हणून सर्वप्रथम आपल्या मनाला सकारात्मक केले पाहिजे. मनाला स्थिर करण्यासाठी भक्तिमार्गाशिवाय उत्तम मार्ग नाही. संत ज्ञानदेव संत तुकोबारायांच्या वाङ्मयातून दिवाळी ही प्रतीकात्मक उपमेय म्हणून पाहायला मिळते. नामदेवरायांच्या वांग्मयातून प्रत्यक्ष पांडुरंग परमात्मा सोबत दिवाळी साजरा केल्याचे वर्णन संत जनाबाईंनी केल्याचे सापडते. ईश्वराप्रती अनन्यनिष्ठा असलेल्या भक्तांना कुठल्याही आसक्तीची,दुर्गुणांची बाधा पोहोचत नाही. मनामनात विवेकदीप प्रज्वलित झाल्याविना दिवाळीचा आत्मिक आनंद घेणे मानवाला शक्य नाही. करिता संत बोध शिरसावंद्य मानला पाहिजे. दिवाळीचा शाश्वत आनंद मानवी जीवनात प्राप्त करण्यासाठी संतांच्या विचारांच्या प्रकाशात मार्गक्रमण करणे हिताचे ठरते.परिणामी मानवाचे जीवन सकारात्मक पद्धतीने जगण्यास जणू सहाय्यकारी ठरेल!

# आझाद हिंद सरकार : स्वातंत्र्यस्वप्नाचे मूर्त रुप




डॉ. राजेंद्र बगाटे
मो. क्र. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5gmail.com

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या गौरवशाली इतिहासात २१ ऑक्टोबर १९४३ हा दिवस विशेष महत्वाचा आहे. या दिवशी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये 'आझाद हिंद सरकार' स्थापन करून स्वातंत्र्यलढ्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप दिले. हे सरकार केवळ प्रतीकात्मक नव्हते, तर भारतीय जनतेच्या आत्मसन्मानाचा, राष्ट्रभक्तीचा आणि स्वातंत्र्याच्या लालित्याचा स्पष्ट प्रत्यय देत होते. ब्रिटिश सत्तेविरुद्ध हे सरकार उभे राहिले, तसेच भारतीयांच्या मनात स्वातंत्र्य मिळवण्याची नवी ज्वाला पेटवली.

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील अद्वितीय नेते होते. देशासाठी त्यांनी जीवनाचे सर्व सुख त्यागून आपले आयुष्य समर्पित केले. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली असतानाही त्यांनी जाणले की अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळवणे पुरेसे नाही. म्हणून त्यांनी सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला. त्यांचा असा विश्वास होता की स्वातंत्र्य मागून मिळत नाही, ते मिळवावे लागते. या विचारातूनच 'आझाद हिंद फौज' आणि 'आझाद हिंद सरकार'ची निर्मिती झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशांच्या ताब्यातील भारतीय सैनिक जपानच्या कैदेत गेले होते. सुभाषबाबूंनी या सैनिकांमध्ये देशभक्तीची ज्वाला पेटवून त्यांना स्वातंत्र्यलढ्यासाठी तयार केले. सिंगापूरमध्ये त्यांनी भारतीय सैनिकांना एकत्र करून 'आझाद हिंद फौज' स्थापन केली, जी भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणारी सशस्त्र संघटना ठरली.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी सिंगापूरमध्ये नेताजींनी 'आझाद हिंद सरकार'ची स्थापना करून भारताला ब्रिटिश अधिपत्यातून मुक्त करण्याचा ठोस राजकीय व लष्करी संकल्प मांडला. सरकारचा ध्वज त्रिरंगी होता, मध्यभागी सिंहाचे चिन्ह होते, आणि घोषवाक्य होते ते जय हिंद! हे घोषवाक्य पुढे स्वतंत्र भारताचे प्रेरक अभिवादन बनले. या सरकारच्या स्थापनेमुळे भारतीय जनतेत नवी उमेद, धैर्य आणि देशभक्तीची ज्वाला पेटली.

सुभाषबाबूंनी स्वतः 'प्रधानमंत्री' व 'युद्धमंत्री' पद स्वीकारले, तर कॅप्टन लक्ष्मी सहगल यांच्या नेतृत्वाखाली 'राणी झाशी रेजिमेंट' या महिलांच्या फौजेत भारतीय स्त्रियांनीही स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. हे पहिले उदाहरण होते, जेथे स्त्रिया स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय आणि सशस्त्र भूमिकेत उतरल्या. सरकारने चलन, नाणी, मंत्रिमंडळ आणि प्रशासकीय यंत्रणा तयार करून स्वातंत्र्यसत्तेचे वास्तव रूप दिले.

'आझाद हिंद फौज'ने 'चलो दिल्ली!' असा प्रेरणादायी नारा देत म्यानमारमार्गे भारतात प्रवेश केला. इम्फाळ, कोहिमा व अराकान येथील लढाईत आझाद हिंद सेनेने ब्रिटिश सैन्याशी प्रखर संघर्ष केला. जरी शेवटी या लढ्यांमध्ये विजय मिळाला नाही, तरी या संघर्षाने भारतीय जनतेत आत्मविश्वास आणि राष्ट्रभक्तीची ज्वाला पेटवली. ब्रिटिश सैन्यातील भारतीय जवानांच्या मनात स्वातंत्र्याची चेतना वाढली, आणि ब्रिटिश सत्तेविरोधातील असंतोषाची लाट निर्माण झाली.

आझाद हिंद सरकार'ला आंतरराष्ट्रीय पातळीवरही मान्यता मिळाली. जपान, जर्मनी, इटली, म्यानमार, फिलीपिन्स, चीन आणि इतर काही देशांनी या सरकारशी अधिकृत संबंध प्रस्थापित केले. यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि इंग्रजांना लक्षात आले की भारतीय स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ स्वप्न नाही, तर ती सत्यात उतरू शकते.

आझाद हिंद सरकारच्या स्थापनेमागील दृष्टिकोन फक्त राजकीय नव्हता; त्यामागे सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता, आर्थिक स्वावलंबन आणि सर्वसमावेशक राष्ट्रवाद यांचा संदेश होता. नेताजींच्या विचारात भारताचा नवजागरणाचा आराखडा होता त्यामध्ये विज्ञान, शिक्षण, उद्योजकता आणि सामाजिक न्याय यावर आधारित एक स्वावलंबी, सशक्त राष्ट्र बनवणे हा उद्देश होता. त्यांनी स्पष्ट केले की स्वातंत्र्य म्हणजे केवळ सत्ता मिळवणे नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक क्रांती देखील साधावी लागते.

सुभाषबाबूंनी सैनिकांना दिलेले प्रसिद्ध वचन तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन हे आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीची ज्वाला पेटवते. त्यांनी दाखवून दिले की स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केवळ शब्द किंवा घोषणा पुरेशा नसतात; त्यासाठी संघटन, धैर्य आणि प्रामाणिक कृती आवश्यक आहे. त्यांच्या नेतृत्वाने भारतीयांना आत्मविश्वास दिला की भारत स्वतंत्र होऊ शकतो आणि भाताचे भविष्य स्वयंपूर्ण होऊ शकते.

१९४५ मध्ये जपानच्या पराभवानंतर 'आझाद हिंद फौज'चा प्रयत्न निष्फळ ठरला, आणि नेताजींच्या विमान अपघाताच्या बातमीने देश हादरला. परंतु त्यांच्या विचारांचा वारसा आजही जिवंत आहे. १९४५-४६ मध्ये 'आयएनए ट्रायल्स' दरम्यान संपूर्ण भारतात आंदोलने झाली. जनतेने जय हिंद आणि नेताजी अमर राहो असे घोषणा देऊन ब्रिटिश सत्तेविरोधी तीव्र आंदोलनाची लाट निर्माण केली. अनेक इतिहासकार मान्य करतात की या आंदोलक लाटेमुळेच ब्रिटिशांनी भारतातून माघार घेण्याचा निर्णय घ्यावा लागला.

आज स्वातंत्र्य मिळून आठ दशकांहून अधिक काळ उलटला असला तरी 'आझाद हिंद सरकार'चा इतिहास आपल्याला आजही प्रेरणा देतो. या सरकारने भारतीयांना दाखवून दिले की स्वातंत्र्य ही फक्त सत्ता नसून, ती जबाबदारी, धैर्य, एकता आणि समाजहितासाठी समर्पण यांचा संगम आहे. नेताजींचा संदेश आजही सुसंगत आहे. देशासाठी कार्य करणे, न्यायप्रिय राहणे आणि राष्ट्रहितासाठी स्वतःला अर्पण करणे म्हणजे खरी स्वातंत्र्याची जाणीव आहे.

२१ ऑक्टोबर हा दिवस फक्त ऐतिहासिक स्मृतिदिन नाही, तर स्वातंत्र्याच्या ज्योतीची ज्वाला पुन्हा प्रज्वलित करण्याचा दिवस आहे. या दिवशी आपण नेताजींच्या त्यागाचे, धैर्याचे आणि देशभक्तीचे स्मरण करतो आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या त्या अमर अध्यायाला अभिवादन करतो ज्याने भारतीयांच्या मनातील स्वाभिमानाची ज्वाला तेजस्वी ठेवली.

'आझाद हिंद सरकार' हा अध्याय इतिहासाचा फक्त भाग नाही; तो भारतीय स्वातंत्र्याच्या आत्म्यात कोरलेली प्रेरणा आहे. आजच्या पिढीने या दिवसाचा अर्थ केवळ भूतकाळात न पाहता, त्यातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेम, सामाजिक न्याय, स्वावलंबन आणि एकता यांचे मूल्य जपले पाहिजे. नेताजींचा संदेश स्पष्ट आहे तो म्हणजे, स्वातंत्र्य मिळवणे फक्त उद्दिष्ट नसून, ते टिकवणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे ही खरी जबाबदारी आहे. या दिवशी आपण सर्वजण एकत्र येऊन देशासाठी आणि स्वातंत्र्यासाठी नेताजींच्या मार्गदर्शनात पुढे जाण्याची शपथ घेऊ या.

पान एक वरुन

## शेतकऱ्यांनो, आत्महत्या करण्यापेक्षा

अन्यायाच्या विरोधात पेटून उठत नाहीत. तुमच्यापेक्षा तुमचा बैल बरा, त्याला लाथ तरी मारता येते. आपण जर शेतकऱ्याला विचारले तर तू काय करतो, तर त्याला काहीच येत नाही.

अरे आत्महत्या करण्यापेक्षा एखाद्या आमदाराला कापून टाका. हा कार्यक्रम जर सुरू केला, तर सरकार गुडघ्यावर येईल. पण हा कार्यक्रम कोणाला द्यायचा. मारण्यापेक्षा लढणे सुरू करा. आमच्या मालाला भाव मिळाला तर आम्ही लोकांना नोकरीला ठेवू. आरक्षणामुळे एखादी परिवार किंवा समाज सुखी होऊ शकतो, मात्र मालाला भाव मिळाला तर अख्खे गाव सुखी होऊ शकेल, असेही बच्चू कडू म्हणाले.

बच्चू कडू म्हणाले, लोकसभेची निवडणूक असताना तुम्ही कापसाला, सोयाबीनला भाव मागितला का? तुम्ही जात पाहिली. पण सर्व जाती याच मातीमुळे जगतात हे विसरू नका. शेतकरी हे सगळ्या जातीत सापडतात. सर्वात जास्त मेहनत आमची आणि आपल्याला हे लुटतात. सरकार हे डुकरासारखे आहे, डुक्कर परवडले पण सरकार नाही. शहरातले आमदार परवडले, पण शेतकऱ्यांचा आमदार परवडत नाही. शहरातल्या आमदारांचे मस्त असते हप्ते वसूल केले की झाले, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

### मला निवडणुकीत शेतकऱ्यांनीच पाडले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लेखणीने लढाई केली. शरद जोशी अडीच लाख पगाराची नोकरी सोडून शेतकऱ्यांसाठी लढले. या सरकारने शेतकऱ्यांना भगवा हिरवा निळा रंगात वाटले आणि त्यामुळे शेतकरी वाटल्या गेला. शरद जोशींना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आणि मलाही शेतकऱ्यांनीच पडले. कारण मी जातीत बसलो नाही. तुम्ही असेच कराल तर तुमच्यासाठी कोणीही लढणार नाही. असेही बच्चू कडू म्हणाले. बच्चू कडू यांनी सरकारविरोधात संघर्षासाठी येत्या २८ ऑक्टोबरला नागपूर येथे एकत्र येण्याचे आवाहन केले.

## महायुतीच्या आमदारांना दिवाळी भेट

वातावरण असून, या निर्णयामुळे दलित वस्त्यांतील विकासकामांना गती मिळणार असल्याचे मंत्री शिरसाट यांनी सांगितले. सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेद्वारे दलित वस्त्यांमध्ये विविध विकासकामे केली जातात. या योजना राज्यातील लोकप्रिय योजनांपैकी एक असून, आमदार, खासदार, मंत्री व इतर लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील सामाजिक विकासासाठी निधी देण्यात येतो.

# ऑपरेशन सिंदूरची कारवाई सुरू असताना पाकिस्ताननं का मानली होती हार? पंतप्रधान मोदींनी सांगितलं कारण

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवानांसोबत केली दिवाळी साजरी





पणजी । वृत्तसेवा

ऑपरेशन सिंदूरची कारवाई सुरू असताना तीन दलामधील असाधारण समन्वयामुळे पाकिस्तानला हार पत्करणं भाग पडल्याचं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. काही जणांना ब्राम्होसचे नाव ऐकलं तर चिंता वाटत तर काही जणांना उत्सुकता वाटते, असे सांगत त्यांनी भारतीय संरक्षण दलाचं कौतुक केलं.

पंतप्रधान मोदी दरवर्षी दिवाळीचा सण हा सैन्यदलाच्या जवानांसोबत साजरा करतात. यंदा त्यांनी गोव्याच्या किनाऱ्यावर तैनात असलेल्या स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतवर नौदलाच्या जवानांसोबत दिवाळी साजरी केली.

पंतप्रधान मोदींनी सुरक्षा दलांच्या शौर्याचं आणि दृढनिश्चयाचे कौतुक केलं. त्यांनी म्हटलं, आयएनएस विक्रांत ही केवळ एक युद्धनौका नाही तर ती २१ व्या शतकातील भारताच्या कठोर परिश्रम, प्रतिभा, प्रभाव आणि वचनबद्धतेची साक्ष आहे, असे मोदी म्हणाले. आयएनएस विक्रांत भारताच्या सशस्त्र दलांच्या क्षमतेचं प्रतिबिंब आहे. 'आत्मनिर्भर भारता'च्या प्रगतीचं प्रतीक आहे, असे ते म्हणाले.

भारत हा माओवादी हिंसाचारापासून मुक्ततेच्या उंबरठ्यावर आहे. पूर्वी १२५ जिल्हे माओवाद्यांच्या दहशतीखाली होते. पण आता ते फक्त ११ जिल्हे राहिले आहेत. मला विश्वास आहे, माओवादी हिंसाचार पूर्णपणे नष्ट करण्यात पोलीस यशस्वी होतील- पंतप्रधान नरेंद्र मोदी

**क्षेपणास्त्रे खरेदी करण्याकरिता इतर देश उत्सुक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोव्यात आयएनएस विक्रांतवर बोलताना 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या ब्रह्मोस आणि आकाशसह स्वदेशी क्षेपणास्त्र प्रणालीचे कौतुक केलं. या प्रणालीच्या कामगिरीनं अनेकांना चिंताग्रस्त केल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं. आयएनएस विक्रांतवरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले आपल्या ब्रह्मोस आणि आकाशसारख्या क्षेपणास्त्रांनी 'ऑपरेशन सिंदूर'मध्येही त्यांची क्षमता सिद्ध केली आहे. अनेक देश आता ही क्षेपणास्त्रे खरेदी करण्यास उत्सुक आहेत.

**संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत ३० पटींची वाढ**

त्यांनी देशाच्या वाढत्या संरक्षण क्षमतेवर भर देत म्हटलं, भारत तिन्ही दलांना लागणारी उपकरणे निर्यात करण्यासाठी सक्षम होत आहे. आम्ही जगातील अव्वल संरक्षण निर्यातदार बनण्याची आकांक्षा बाळगतो. गेल्या वर्षी संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत ११ वर्षांच्या तुलनेनं ३० पट वाढ झाली आहे. सरासरी दर ४० दिवसांनी एक नवीन स्वदेशी युद्धनौका किंवा पाणबुडी भारतीय नौदलात समाविष्ट केली जात आहे. हे संरक्षण उत्पादनातील देशाच्या वेगवान प्रगतीचं उदाहरण आहे.

**ट्रम्प यांचे दावे भारतानं फेटाळले**

पाकिस्तानला हार पत्करण्याकरिता सैन्यदलाची कामगिरी कारणीभूत ठरल्याचं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी करून भारत-पाकिस्तानमधील युद्ध थांबविल्याचं वारंवार वक्तव्य केलं आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या वक्तव्यामुळे अमेरिकेचा दावा पुन्हा एकदा भारतानं अप्रत्यक्षपणं फेटाळल्याचं स्पष्ट होत आहे.

## 'शोले चा जेलर कालवश' 'असरानी' यांनी घेतला अंतिम श्वास



मुंबई । प्रतिनिधी

असरानी' म्हणून प्रसिद्ध असलेले अभिनेते-दिग्दर्शक गोवर्धन असरानी यांचे आज मुंबईत दीर्घ आजाराने निधन झाले. सांताक्रूझ स्मशानभूमीत त्यांचे अंतिम संस्कार करण्यात आले. एएनआय या वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार त्यांचे निधन हे दिर्घ आजाराने झाले आहे.

८४ वर्षीय अभिनेते यांचे आज दिवाळी दिवशी निधन झाले आहे. ते गेले अनेक दिवस आजारी होते ५ दिवसांपूर्वी त्यांच्या कुंटुंबियांनी त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती केले होते. पण उपचारांना त्यांनी प्रतिसाद दिला नाही. आज सोमवारी २० ऑक्टोबर रोजी संध्याकाळी त्यांनी अंतिम श्वास घेतला.

अभिनेते असरानी यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक अजरामर भुमिका केल्या. यात हिंदी चित्रपटसृष्टीतील माईलस्टोन ठरलेल्या शोले पिक्चरमधील जेलर ची भूमिका हे आजही प्रेक्षकांच्या मनात घर करुन आहे. 'हम अंग्रेज के जमाने के जेलर है' असे म्हणून खूप शूरवीर असल्याचे भासवणारे व प्रत्यक्षात वेगळेच असणारे पात्र आजही जसेच्या तसे लोकांना आठवते. त्याचे रिल्स अजूनही व्हायरल होतात.

## 'ठोकतो, तोडतो' अशी इन्स्टाग्रामवर स्टोरी टाकणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

बारामती । प्रतिनिधी

'आम्ही ठोकत नाही ओ, मी तोडतो, माझा पॅटर्नच वेगळा आहे' अशी धमकी व दहशत असलेला व्हिडिओ आणि त्याला 'सरकार नो कॉम्प्रोमाइज ' असे कॅप्शन टाकून सोशल मीडियावर टाकणाऱ्या तरुणावर बारामती तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

श्रीकांत अर्जन घुले (वय २५ रा. ढेकळवाडी,ता.बारामती) असे या तरुणाचे नाव असून, त्याने १८ ऑक्टोबर रोजी त्याच्या इन्स्टाग्राम आयडीवर वंजारवाडी जीवे मारण्याच्या प्रकरणाच्या अनुषंगाने हा व्हिडिओ पोस्ट केला होता. समाजात दहशत आणि भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलीस निरीक्षक यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील आणि आणि पोलिस जवान पो. कॉ. राजू बन्ने यांनी खातरजमा करून बन्ने यांच्या तक्रारीवरून बारामती तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी ही बाब गांभीर्याने घेत कायद्याचा बडगा उगारला आहे. श्रीकांत घुले याच्यावर बीएनएस कलम ३५३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सोशल मीडियावर 'दादागिरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केल्याने बारामती तालुका पोलिसांचे कौतुक होत आहे.

## शेतकऱ्यांची दिवाळी काळी, महायुती सरकारने केली शेतकऱ्यांची फसवणूक-विजय वडेट्टीवार यांचा आरोप

नागपूर । प्रतिनिधी

राज्यसरकारनं शेतकऱ्यांना भरघोस मदत करू असं सांगत ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली. दिवाळीला सुरुवात झाली तरी प्रत्यक्षात सरकारने मात्र १८०० कोटी पर्यंतच्या मदतीचे जीआर आले आहेत. सरकारने जी मदत दिली आहे, त्यातही कुठली वाढ केलेली नाही. राज्य सरकार केवळ हेक्टरी १० हजार रुपयांची मदत दिली आहे. त्यामुळे ही मदत तुटपुंजी असून ही शेतकऱ्यांची फसवणूक असल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी ही दिवाळी काळी दिवाळी ठरणार आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबरच्या कालावधीत अतिवृष्टीमुळे नुकसान झालं आहे. याबाबत सरकारने दिवाळीपूर्वी मदत करू असं सांगितले, पण जाहीर केलेली मदत ही तुटपुंजी आहे. पुरामुळे शेतीपिकांचं नुकसान, शेतजमीन खरडून गेली, विहिरीचं नुकसान, घरं पडली आहेत.



राज्यातील २५३ तालुक्यांना अतिवृष्टीचा फटका बसलेला आहे, पण या तालुक्यांमधील शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत एनडीआरएफ निकषाच्या प्रमाणे आहे. त्यात जास्तीची मदत नाही. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरवडल्या आहेत, त्यांना दिलेली मदत ३ वर्षात मिळणार आहे. तोपर्यंत शेतकरी कसा जगणार? त्यामुळे शेतकऱ्यांनी काळी दिवाळी साजरी करून सरकारचा निषेध करावा, असं आवाहनही वडेट्टीवार यांनी केलं.

**तर शेतकरी बरबाद होईल**

कापूस खरेदीला अद्यापही सीसीआय परवानगी मिळालेली नाही. त्यासाठी टाकलेल्या अटी फार जाचक आहेत. त्यामुळे कापूस खरेदी करताना हात आखडता घेतला जाणार आहे. परिणामी शेतकरी बरबाद होऊन जाईल. अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिक गेलं आहे, त्यास मिळणारा भाव इतका कमी आहे की शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. सरकारनं शेतकऱ्यांचा हा छळ करू नये असं ते म्हणाले.

**मंत्र्यांना मलिदा खाण्याची सोय**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यावरील विद्यमान व्यवस्थापन मंडळाऐवजी पणन मंडळ मंत्र्यांच्या हातात कृषी उत्पन्न बाजार समितीची सूत्रं जाणार आहेत. यातून मंत्र्यांना मलिदा खाण्याची सोय करण्यात येत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोट्यवधीची उलाढाल होते. त्यावर, मंत्र्यांची वाईट नजर गेल्याने हा निर्णय झालेला आहे. निवडून आलेले प्रतिनिधी मंडळ बरखास्त करणे, हा अन्याय आहे अशी टीका यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

## प. महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला जीआरचा फायदा होणार नाही; मंत्री बावनकुळेंनी स्पष्टच सांगितलं

मुंबई । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारची भूमिका ठाम असून, कोणाच्याही ताटातील वाटा काढून दुसऱ्याला दिला जाणार नाही, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिली.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून तीन प्रमुख नेत्यांमध्ये वेगवेगळी मते असल्याचे निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले, २ सप्टेंबरचा शासन निर्णय न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे, त्यावर अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही. मात्र, हैद्राबाद गॅंझेटियर हे मराठवाडा आणि विदर्भ या भागापुरतेच लागू असून पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाजाला त्याचा फायदा होणार नाही. त्यामुळे, ओबीसी नेत्यांनी गैरसमज करुन घेऊ नये, असेही ओबीसी उपसमितीचे प्रमुख असलेल्या बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा आणि ओबीसी समाज आमने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. ओबीसी नेत्यांनी २ सप्टेंबरचा शासन आदेश हा ओबीसींच्या आरक्षणावर घाला घालणारा असल्याचं म्हटलं. त्याच, अनुषंगाने बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार मेळावा देखील संपन्न झाला. तर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून मनातील खंत आक्रमक व भावनिकपणे बोलून दाखवली. आता, यासंदर्भात बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी, कोणच्याही ताटातील दुसऱ्या कोणाला दिले जाणार नाही याबाबत नेत्यांनी खात्री बाळगावी, असे म्हटलं आहे.

## 'धनुष्यबाण' प्रकरणात निर्णायक टप्पा; सर्वोच्च न्यायालयात सुरु होणार मोठी लढत !

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावरून सुरु असलेला संघर्ष आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. राज्याच्या राजकीय समीकरणात उलथापालथ घडवू शकणाऱ्या या सुनावणीने सर्व पक्षांचे डोळे सर्वोच्च न्यायालयाकडे लागले आहेत. शिवसेना उबाठा आणि शिवसेनेतील ही प्रतिष्ठेची झुंज आता दिल्लीच्या न्यायालयीन मैदानात रंगणार आहे.

या प्रकरणात उद्धव ठाकरे यांची शिवसेना उबाठा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना हे दोघेही आपापले हक्क सिद्ध करण्यासाठी सज्ज आहेत. सत्ता हस्तांतरण, पक्षचिन्हावर हक्क, आणि विधानसभेतील अधिकार यावरून गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेली ही राजकीय कुरघोडी आता न्यायालयीन रणांगणात निर्णायक फेरीत दाखल झाली आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयानंतर शिवसेनेच्या 'ओळख' आणि 'हक्का'वर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरेंकडून धनुष्यबाण चिन्ह शिवसेनेला दिल्यानंतर शिवसेना उबाठाकडून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. आयोगाने आपली अधिकारकक्षा ओलांडली का, यावरच आता सुनावणीचा केंद्रबिंदू असेल.

## 'दिवाळी आलीय, पण पोरांना कपडे घेण्यासाठी.' चिठ्ठी लिहून शेतकऱ्याने गळफास घेत संपवले जीवन

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातून पुन्हा एकदा दुर्दैवी आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र उत्साहाचं वातावरण असताना, एका शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा आणि आर्थिक तंगीमुळे टोकाचा निर्णय घेत आपले जीवन संपवलं आहे.

माहितीनुसार, रामेश्वर खंडागळे असे या मृत शेतकऱ्याचं नाव असून, ही घटना जालना तालुक्यातील शेवगा गावात घडली आहे. रामेश्वर यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून ठेवली असून, त्यामध्ये त्यांनी आपल्या दुःखाची आणि विवंचनेची नोंद केली आहे.

**अनुदान मिळालं असतं तर**

त्या चिठ्ठीत त्यांनी लिहिलं आहे की, दिवाळी आलीय, पण पोरांना कपडे घेण्यासाठी पैसे नाहीत. शेतात नुकसान झालं, सरकारकडून मदत मिळाली नाही. अनुदान मिळालं असतं, तर दिवाळी साजरी झाली असती... अशी वेदनादायी ओळ त्यांनी लिहिली आहे.

या मन हेलावून टाकणाऱ्या चिठ्ठीमध्ये त्यांच्या मानसिक स्थितीची झलक दिसते. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणातही शेतकऱ्याच्या घरात अंधार पसरला. कर्जबाजारीपण, उत्पन्नाचा अभाव आणि पिकांचे नुकसान या ताणांमुळे त्यांनी शेवटी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

**सापडलेली चिठ्ठीही जप्त**

घटनेची माहिती मिळताच, मौजपुरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविले आहे. पोलिसांनी शेतकऱ्याजवळ सापडलेली चिठ्ठीही जप्त केली आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. गावकऱ्यांसह स्थानिक शेतकरी संघटनांनी प्रशासनाकडे या प्रकरणाची सखोल चौकशी करून कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी आणि अपुऱ्या अनुदानामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. त्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती होत असल्याने समाजमन सुन्न झाले आहे.

## महसूलमंत्र्यांकडून दिवाळी भेट, ४७ अधिकाऱ्यांना बढत्या; महाराष्ट्राला मिळाले ४७ नवे अपर जिल्हाधिकारी

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या महसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत. तब्बल गेल्या १० वर्षांपासून अधिकाऱ्यांच्या बढत्या रखडल्या होत्या.

ऐन दिवाळीच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारकडून आज शासन आदेश जारी करत अधिकाऱ्यांना दिवाळी भेट देण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल अधिकाऱ्यांना पदोन्नतीची दिवाळी भेट दिली आहे. तत्पूर्वी आज मंत्रालयातील दालनात जाऊन बावनकुळे यांनी राज्यातील सर्वच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरेन्सिंगद्वारे संवाद साधला.


देशभरात दिवाळीचा उत्साह असून कामगार, कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनसही मिळाला आहे, तर अद्यापही काहींना दिवाळी भेटवस्तू दिल्या जात आहेत. आता, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूलमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिवाळी भेट दिली आहे. हसूल विभागातील ४७ अधिकाऱ्यांना बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, महाराष्ट्राला ४७ नवे अपर जिल्हाधिकारी मिळाले आहेत.


सामान्य प्रशासन १५ ऑक्टोबर रोजीच्या इतिवृत्तान्वये, आस्थापना मंडळ (क्रमांक २) यांनी अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या पदोन्नतीच्या पदाची पात्रपात्रता तपासून निवडसूची वर्ष २०२५-२६ मध्ये अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी एस २५-१ ७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट-अ) (वेतनश्रेणी एस २७-११,२३,१००-२,१५,९००/-) या संवर्गात नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे, असे शासन आदेशात म्हटलं आहे.

**३० दिवसांत नव्या पदावर हजर राहण्याची सूचना**

दरम्यान, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ (६) (३) मधील तरतुदनुसार पदोन्नत अधिकारी ३० दिवसांचे आत रूजू न झाल्यास सदरचे अधिकारी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील. १५. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रूजू झाल्याबाबतचा अहवाल revenuemaharashtra.gov.in या ई-मेलव्दारे/टपालाव्दारे शासनास त्वरीत कळवावे, असेही आदेशात म्हटले आहे.

महसूल विभाग जनतेच्या आशा, आकांक्षांना मूर्तरूप देणारा विभाग आहे. हा विभाग अधिकाधिक जनताभिमुख व्हावा. पारदर्शी रहावा, यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू. सर्वसामान्य जनतेशी थेट संबंध येणाऱ्या मोजक्या शासकीय विभागांपैकी आपला हा विभाग महत्वाचा घटक आहे. तो अधिक बळकट व्हावा, कार्यक्षम व्हावा आणि त्यातून राज्याची प्रगती उत्तरोत्तर व्हावी, असा संकल्प आपण सारे मिळून दीपपर्वाच्यानिमित्ताने करूया, असे म्हणत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयातील सहकाऱ्यांसमवेतचा फोटो शेअर केला आहे.

# रंजेगाव येथील दोनशे शेतकऱ्यांना नाम फाउंडेशन तर्फे मोफत बियाण्यांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील रंजेगाव येथील पूरग्रस्त आणि अतिवृष्टी बाधित दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात आले. नाम फाउंडेशन तर्फे बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करण्यात येत आहे. रंजेगाव येथील या शेतकऱ्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते बियाणांचे वाटप करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील कुर्ला या गावात वाटप करण्यात आल्यानंतर माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे देखील नाम तर्फे बियाण्याचे वाटप करण्यात आले. रंजेगाव येथील



दोनशे शेतकऱ्यांना बियाण्याचे वाटप करताना गावातील रहिवाशी सामाजिक कार्यकर्ते आसाराम आबूज यांनी विशेष मेहनत घेतली. आसाराम आबूज यांना या कामात एकनाथ आबूज रामनाथ आबूज यांनी मदत केली. शेतकऱ्यांना आबुज सर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

यावेळी प्रत्येक शेतकऱ्यांना ३० किलो हरभऱ्याच्या बिया सह ज्वारीचे बी देखील देण्यात आले. बियाण्यांची पेरणी करून शेतकऱ्याने चांगले उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करावा. तसेच गावात पाणीसाठा वाढावा यासाठी नदी खोलीकरण अथवा गाळ काढण्याचे काम करावे त्यासाठी पोकलेन मशीन मोफत देण्यात येतील, असे आवाहन ड. अजित देशमुख यांनी यावेळी केले.

## वादग्रस्त बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक

# रणजीत कासलेला अटक

बीड । प्रतिनिधी

बीड पोलिस दलातील बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासलेला मध्यरात्री गुजरात पोलीसांनी लातूरमधून अटक केली आहे. गुजरातमधील जबरी घर फोडीतील आरोपींना मदत केल्याचा संशय असल्यावरुन कासलेला अटक करण्यात आल्याचे समजते. गुजरात पोलिसांनी दोन दिवसांपासून रणजीत कासलेच्या अटकेसाठी शोध मोहीम सुरु केली होती. अखेर लातूर पोलीस आणि गुजरात पोलीसांच्या एकत्रित मोहीमेदरम्यान आज मध्यरात्री कासलेला ताब्यात घेण्यात आले.

लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कासलेला ताब्यात घेण्यात आले. यानंतर गुजरात पोलिसांकडे त्याच्या ताबा देण्यात आला. पोलिस त्याला गुजरातला घेऊन गेले आहेत. सूरत आणि आजुबाजूच्या परिसरात जबरी घरफोड्या आणि चोऱ्या करणाऱ्या आरोपींकडून रणजीत कासलेची माहिती पोलिसांना मिळाली. कासलेने आपल्याला मदत आणि इतर सहकार्य केल्याचे आरोपींनी गुजरात पोलिसांना सांगितले. यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. कासलेचा माग काढला आणि अखेर तो लातूरमध्ये असल्याचा ठावठिकाणा लागला.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर रणजीत कासले याने वाल्मिक कराडबाबत अनेक धक्कादायक खुलासे केले होते, कासलेच्या आरोपामुळे बीड पोलिस दलाची लक्तरे वेशीवर टांगली गेली.कासले याने वाल्मीक कराड याबाबतच्या अनेक चित्रफिती सोशल व्हायरल केल्या होत्या. त्याचबरोबर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांवर थेट आरोप केले होते.

रणजीत कासलेवर आतापर्यंत ७ गुन्हे दाखल झाले आहेत. बीड कारागृहात असताना त्याने वाल्मिक कराड याला चिकण, मटण आणि सर्व सोयीसुविधा देण्यात येत असल्याचा दावा केला होता. कासले जामीनावर बाहेर आला होता. त्यानंतर त्याने पुन्हा त्यांच्या सोशल मीडिया वर अनेक गौप्यस्फोट केले. सोशल मीडियावर नेत्यांची ' पोलखोल ' करणं बडतर्फ रणजित कासलेला भोवलं. रणजीत कासलेला मुंबई गुन्हे शाखेने अटकही केली होती. तो जामीनावर बाहेर असताना आता गुजरात पोलिसांनी त्याला नव्या प्रकरणात अटक केली आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीची पाटोद्यात बैठक

पाटोदा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाटोदा येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्धार, बूथस्तरावर संघटन बळकट करणे, आणि सामाजिक व विकासात्मक मुद्द्यांवर ठाम भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीचे अध्यक्ष जिल्हाध्यक्ष अजय सरवदे होते. त्यांनी ही लढाई जनतेसाठी असल्याचे सांगितले. यावेळी खंडू नाना जाधव, सचिन मेघडंबर, बाळासाहेब गायकवाड



आदी पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सरवदे यांनी हुकूमशाहीला पूर्णविराम, आता वंचितलाच संधी! या घोषणेने कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवली.

बैठकीत आगामी कार्यक्रमांचे नियोजन, जबाबदाऱ्या वाटप व पक्षविस्तारावर चर्चा झाली. या बैठकीला मिलिंद सरपते,दीपक थोरात, गोविंद यादव, मधुकर पायाळ,गणेश पवळ, अनिकेत जावळे, सिद्धार्थ आगे, ईश्वर चौरे, राहुल शिरोळे, गणेश सोनवणे सह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री जनीजनार्दन स्वामी संस्थानचा यावर्षी ४२५ वा वार्षिक महोत्सव

## थोरले पाटंगणावर ३० ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**भगवतभक्ती सागराचा लाभ घेण्याचे मठाधिपती श्री विनायक महाराजांचे आवाहन; विद्वन्मणि पुरस्कारने होणार पंडित प्रमोदशास्त्री यांचा गौरव**

बीड । प्रतिनिधी

श्री जनी जनार्दन स्वामी महाराज संस्थान थोरले पाटगंण येथे वार्षिक महोत्सव गुरुवार ३० ऑक्टोबर पासून सुरू होत आहे, विविध धार्मिक कार्यक्रमाने भगवतभक्ती सागराचे रूप धारण करणाऱ्या या बीडच्या श्रद्धा आणि परंपरेच्या उत्सवाचे हे ४२५ वे वर्ष असून ६ नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व कार्यक्रमात सहभागी होऊन भगवतकृपा प्रसादाचा लाभ घ्यावा असे नम्र आवाहन मठाधिपती श्री विनायक महाराज पाटंगणकर यांनी केले आहे.

गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी श्री ज्ञानेश्वरीच्या अखंड पारायण सेवेने या उत्सवास सुरुवात होत असून, शुक्रवार ३१ ऑक्टोबर रोजी श्री सोमयागी यज्ञ मार्तंड श्री यज्ञेश्वर महाराज सेलुकर यांच्या उपस्थितीत श्रीसूक्त हवन चा भव्य सोहळा, १ नोव्हेंबर रोजी स्थानिक नामवंत कलाकारांची भजन संध्या, दोन आणि तीन नोव्हेंबर रोजी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा, वय वर्ष ५ ते ११ आणि त्यापुढील दोन अशा गटात या स्पर्धेचे नियोजन केलेले आहे, या दिवशी श्री सज्जनगड चे भूषणस्वामी महाराज यांची उपस्थिती आणि संत पूजन सोहळा होणार आहे, तर मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी वे.शा.सं. धुंडीराज शास्त्री पाटंगणकर स्मृती प्रित्यर्थ पुरस्कार सोहळा दुपारी ठीक ४ वाजता संपन्न होणारा आहे. यावर्षी पंडित प्रमोदशास्त्री कुलकर्णी (परभणी) यांना विद्वन्मणि हा पुरस्कार आणि भगवद्गीता सेवेतील सौ संध्या कुलकर्णी यांचा सत्कार यावेळी श्री ईश्वर गुरुजी घनपाटी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे .५ नोव्हेंबर रोजी गीता पाठ आणि गुरुवार ६ नोव्हेंबर रोजी आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज (श्री अमृत महाराज जोशी) यांचे काल्याचे कीर्तन आणि महाप्रसाद होणार आहे. ७ नोव्हेंबर रोजी मठाधिपती श्री विनायक महाराज पाटंगणकर यांच्या ललिताच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होणार आहे.

या वार्षिक महोत्सवात दररोज चतुर्वेद पारायण होणार आहेच, तसेच चातुर्मासाच्या निमित्ताने नित्याचे काकड आरती, पंचामृतपूजा, अभिषेक इत्यादी उपक्रमासोबतच प्रत्येक एकादशी दिवशी गीतापाठ, दर चतुर्थीला अथर्वशीर्ष पाठ असे उपक्रमही पाटंगणावर सुरू असतात. या वर्षीचा हा ४२५ वा वार्षिक महोत्सव आणि त्यातील सप्ताहभर आयोजीत भरगच्च कार्यक्रमातून सर्व भाविक भक्तांनी, समस्त बीडकरांनी सहभागी व्हावे आणि भगवतभक्ती कृपाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.












हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा

९४२३४७१८३३

७०२०६४२६९३

संचार न्यूज ५

WhatsApp group

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा